


# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम.ए., पीएच्.डी.
संचालक


संदर्भ क्र. विविमं/२०१७–१८/२९३ दिनांक : ०४/०९/२०१७

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठीशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

विषय : महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गणेश विसर्जनाच्या धार्मिक बाबतीत हस्तक्षेप न करण्याबाबत.
संदर्भ क्र. : १. मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे यांचे शिससं/उशि/पुवि/संकीर्ण/हिंजस/ २०१६–१७/२०२९, दि. २९.८.२०१७ चे पत्र
२. हिंदू जनजागृती समिती यांचे पत्र दि. २८.८.२०१७ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त सदंर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यास येते की, शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण) पुणे यांनी गणेश मूर्ती विसजर्नाच्या वेळी विद्यार्थ्यांनी धार्मिक प्रथांमध्ये हस्तक्षेप करू नये किंवा त्याबाबत काळजी घ्यावी अशा आशयाचे पत्र कार्यालयास पाठवले आहे.

याबाबतचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. याबाबत आपण आपल्यास्तरावर योग्य ती चौकशी करावी असेही निर्देशित केले आहे. तरी याबाबतचा अहवाल कार्यालयास पाठवावा. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

संचालक (अतिरिक्त कार्यभार),
विद्यार्थी विकास मंडळ

(1)

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७ डॉ आंबेडकर रोड, पुणे विभाग,पुणे-१

फोन नं ०२०-२६१२०८३३ Web www.jdhepune.. mail ID- ... फॅक्स नं. ०२० २६०५३६३३

जा.क्र.शिसस/उशि/पुवि/संकिर्ण/हिंजस/२०१६-१७/2029 दिनांक - २९.८.२०१७

प्रति,
कुलसचिव,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड, पुणे.

सा. फु. पुणे विद्यापीठ आवक /... 2893 दिनांक - 29/8/2017 4/9 Dir. BSD

विषयः- पुणे विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गणेश विसर्जनाच्या धार्मिक बाबतीत हस्तक्षेप न करण्याबाबत...

संदर्भः- हिंदु जनजागृती समिती यांचे पत्र दि. २८.८.२०१७.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, हिंदु जनजागृती समितीचे वरील संदर्भिय पत्र प्रस्तुत कार्यालयास प्राप्त झालेले आहे. (सुलभ संदर्भासाठी सदर पत्राची प्रत सोबत जोडली आहे.)

तरी उपरोक्त विषयाबाबत प्राप्त पत्रानुसार विद्यापीठ स्तरावरुन सर्व संलग्नित अशासकीय अनुदानित/कायम विना अनुदानित/विना अनुदानित महाविद्यालयांना आवश्यक ते निर्देश देण्याबाबत तपासून कार्यवाही करण्याबाबत आपणास सुचित करण्यात येत आहे.

(डॉ. विजय नारखेडे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १.

प्रभ्रमणध्वनी क्रमांक

ई-मेल contact@HinduJagruti.org

संकेतस्थळ www.HinduJagruti.org

हिंदूसंघटन आणि हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी कार्यरत

# हिंदु जनजागृती समिती

नोंदणी क्र. : 1540/I-634, १२.११.२००२, फोंडा, गोवा.

नोंदणीकृत कार्यालय : 'मधु स्मृति', घर क्र. ४५७, पहिला मजला, बैठक सभागृह, सत्यनारायण मंदिराजवळ, ढवळी, फोंडा, गोवा ४०३ ४०१.

।। जयतु जयतु हिन्दुराष्ट्रम् ।।

दिनांक : २८.०८.२०१७

प्रति,

शिक्षण, सह संचालक,

पुणे विभाग.

सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभागीय कार्यालय
पुणे - १
आवक क्र. 4883
दिनांक 29 AUG 2017

विषय : पुणे विद्यापिठाअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गणेश विसर्जनाच्या धार्मिकबाबतीत हस्तक्षेप न करण्याबाबत.....

महोदय,

गणेशोत्सव हा पुण्याचा, तसेच संपूर्ण हिंदु धर्माचा मानबिंदू आहे. बुद्धीदाता श्री गणेश आपणा सर्वांवरच गणेशोत्सवाच्या १० दिवसांच्या कालावधीत कृपेचा वर्षाव करत असतो. त्या दिवसांमध्ये श्रद्धायुक्त अंतःकरणाने पूजन केलेली श्रींची मूर्ती वहात्या पाण्यात विसर्जन करण्याची धार्मिक परंपरा या उत्सवात आहे. असे असतांना अनेक पर्यावरणप्रेमी भाविकांना मूर्तीदान करण्याविषयी अथवा कृत्रिम हौदात विसर्जन करण्याविषयी आग्रह करत असल्याचे निदर्शनास आले आहे. यामध्ये मागील वर्षी महाविद्यालयीन युवक त्यांच्या गणवेश आणि ओळखपत्रासह अन्य संघटनांसह सहभागी झाल्याचे निदर्शनास आले होते.

प्रदूषण नियंत्रण मंडळाने वारंवार सांगूनही वर्षभर वरीलप्रमाणे होणाऱ्या पर्यावरणाच्या गंभीर हानीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणारे पालिका प्रशासन आणि ढोंगी पर्यावरणवादी आपल्या कृत्यावर पांघरूण घालून वर्षातून एकदाच होणाऱ्या गणेशोत्सवामुळे प्रदूषण होते, अशी भूमिका घेत आहेत, तसेच गणेशमूर्तींच्या वहात्या पाण्यातील परंपरागत विसर्जनाला विरोध करत आहेत. याचसमवेत अनेक ठिकाणी महाविद्यालयीन युवकांना हाताशी धरून बलपूर्वक गणेशमूर्तींचे दान करण्यास किंवा कोट्यवधी रुपये खर्चून बांधलेल्या कृत्रिम हौदात विसर्जन करण्यास सामान्य गणेशभक्तांना भाग पाडले जात आहे. नंतर या गणेशमूर्ती घाणेरड्या दगडांच्या खाणीमध्ये, पडक्या विहिरींमध्ये, खड्ड्यांमध्ये वा निर्जनस्थळी टाकल्या जात आहेत. या गणेशमूर्ती महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाच्या 'कचरा भरण्याच्या' गाडीतून वाहून नेल्या जात आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर गणेशमूर्तींची विटंबना होऊन हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावल्या जात आहेत. बुलडोझरखाली टाकून त्यांचा चुरा केला जातो. काही ठिकाणी दगडांच्या खाणी भरून त्यांची घोर विटंबना होत असल्याची माहिती प्रसिद्धीमाध्यमांद्वारे वेळोवेळी उघड झाली आहे आणि ते माहिती अधिकारातूनही पुढे आले आहे. ही बाब अतिशय गंभीर आणि हिंदूंच्या धार्मिक स्वातंत्र्याचा संकोच करणारी आहे.

गणेश विसर्जन हा विधी पूर्णतः हिंदु धर्मातील धार्मिक विधी असून त्याच्याशी हिंदूंच्या धार्मिक भावना जोडलेल्या आहेत, तसेच राज्यघटनेने प्रत्येकाला धार्मिक स्वातंत्र्य दिले आहे. असे असतांना महाविद्यालयीन युवकांना हाताशी धरून तथाकथित पर्यावरणवादी संघटनांच्या धार्मिक भावना दुखावण्याच्या कृत्याला हातभार लावल्यासारखे होते. तरी आपणांस या निवेदनाद्वारे विनंती करण्यात येत आहे की, आपण महाविद्यालयातील युवकांना अशा धार्मिक भावना दुखावणाऱ्या कार्यात हातभार लावण्यापासून थांबवावे आणि धर्महानी रोखावी. जर आपण असे केले नाही, तर कदाचित भविष्यकाळात गणेशमूर्तींची विटंबना होऊन हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावल्या जाऊ शकतात. तरी आपण योग्य ती खबरदारीपर सूचना महाविद्यालयांना द्याव्यात, ही विनंती !

आपला विश्वासू,

१) सुधाकर ब. सडोनवार
योग वेदांत सेवा समिती

२) श्रीमती ... कुलकर्णी ...

श्री. पराग गोखले, हिंदु जनजागृती समितीकरता, संपर्क : ८९८३३३५५१७

३) अनुप नामदेव भोंडे

४) प्रवीण नाईक, सनातन संस्था

५) ... महासंघ